मोहक युरोप

लता गुठे





मोहक
युरोप

मोहक युरोप

(युरोप प्रवासवर्णन)

लता गुठे

भरारी प्रकाशन

मोहक युरोप

प्रकाशक : **लता गुठे**

भरारी प्रकाशन
४०३, धनलक्ष्मी विहार,
नंदा पातकर रोड, विलेपार्ले (पूर्व),
मुंबई - ४०० ०५७.
मोबाइल : ९८७०६१७१२४
ईमेल : lataguthe@gmail.com

प्रथम आवृत्ती : १८ डिसेंबर, २०१४

मुद्रक : त्रिमुर्ती आर्ट प्रिंन्टर्स
अे-२, २३८, शहा ॲन्ड नाहर इंडस्ट्रियल इस्टेट,
ए. जे. मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३.
टेली : ९८३३१६५४५५
E-mail : narengaokar1963@gmail.com

अक्षरजुळणी व सजावट : वैष्णवी ग्राफिक्स
शॉप नं. ८, माणिक हौ. सो., सनमिल लेन,
सिताराम जाधव मार्ग, लोअर परेल(वेस्ट),
मुंबई - ४०० ०१३.
E-mail : shashi265@gmail.com

मूल्य : २००/-

अर्पण

सदैव आशीर्वादाचा हात डोक्यावर ठेवून लिखाणाला प्रेरणा देणारे आदरणीय पद्मश्री मधु मंगेश कर्णिक सर (मधु भाई) यांना 'मोहक युरोप' हे पुस्तक सादर अर्पण !



मनातले गुज...



'जीवनवेल', 'मी आहे तिथे', आणि 'इटुकले पिटुकले' या तीन कवितासंग्रहानंतर कथा क्लबच्या निमित्ताने अनेक कथा लिहून झाल्या. त्या अनेक दिवाळी अंकात प्रसिद्धही झाल्या त्यामुळे गद्य लिखाणाकडे वळले. युरोपला जाऊन आल्यानंतर प्रवासवर्णन लिहायचा विचार केला आणि लिहून पूर्णही झाले.

संपादिका, प्रकाशिका म्हणून जेव्हा मी काम करत असते त्या वेळेला दर्जेदार आणि सर्वच प्रकारचे साहित्य वाचले जाते. रोज नवीन अनुभव येत असतात त्यातूनच बरेच काही शिकायला मिळते. रोज समोर येणाऱ्या समस्या मला विचार प्रवृत्त करतात. उघड्या डोळ्याने जगाकडे पाहायला लागले कि लिहिण्यामागे प्रक्रिया सुरु होते हेच कारण युरोप प्रवासवर्णन लिखाणामागे आहे.

कुठेतरी फिरायला जायचे असे बऱ्याच दिवसापासून चालले होते. घरात चर्चा चालू असतांना मुलगा म्हणाला, ''जायचेच आहे फिरायला तर युरोपलाच जा.'' त्याचा विचार आम्हालाही पटला त्या दरम्यान टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स कंपन्यांच्या जाहिराती वर्तमानपत्रात येत होत्या. सर्व आढावा घेऊन झाल्यानंतर 'कॉक्स ॲण्ड किंग्सची' निवड केली, लगेच त्यांच्या कार्यालयात जाऊन संपूर्ण माहिती घेतल्यानंतर आम्हाला सोईच्या दृष्टीने असलेली तारीख निवडली अन् लगेच बुकिंग केले. त्यानंतर पहिले काम हातात घेतले ते म्हणजे पासपोर्ट रिन्यू करण्याचे. ते काम झाल्यानंतर जाण्याची तारीख जसजशी जवळ येऊ लागली तसतसा आमच्या तयारीला वेग येऊ लागला. पासपोर्ट, व्हिसा, खरेदी सर्व तयारी झाली. अन् जाण्याचा दिवस उगवला.

१६ एप्रिल २०१३ रोजी सकाळी नऊ वाजता छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन आम्ही लंडनच्या दिशेने रवाना झालो. युरोपमध्ये आलेले अनुभव बसमध्ये फिरतांना वेळ मिळेल तसे लिहून ठेवले होते. सहलीनंतर काही महिन्याने जितक्या आठवणी माझ्या स्मरणात घर करून राहिल्या होत्या तेवढ्यांवरून जमेल तितका सविस्तर वृत्तांत लिहू लागले. डायरीत लिहिलेल्या टिपणांचा युरोपचे प्रवास वर्णन लिहितांना फार उपयोग झाला. काही अनुभव आठवत होते, काही निसटत होते. अधून मधून तेथे काढलेले फोटो व व्हि.डि.ओ शुटींग पाहून तिथे घालवलेला प्रत्येक क्षण आठवू लागला. इटनरीच्या आधारे प्रथम आराखडा तयार केला युरोपमध्ये आलेले अनुभव मला, आवडले व न आवडलेले सारे काही लिहिले.

प्रत्येक ठिकाणाचं वेगळेपण अनुपम निसर्गाची कितीतरी रुपे अनुभवायला मिळाली त्यामध्ये भूलोकीचा स्वर्ग स्वित्झर्लन्ड, कालव्यांचं शहर ॲमस्टरडॅम, विलोभनीय सौंदर्य लाभलेलं ल्यूसर्न, ट्युलिपची बाग, रोम मधील भव्य दिव्य ऐतिहासिक वास्तुकला, म्युझियम्स, चित्रकला, शिल्पकला पाहून मन मोहून गेले. छोटी मोठी शहरं, तेथील मोठे चौक, आकर्षक नगर रचना, रस्ते, मॉल्स पाहातांना अनेक अंगाने कलाविष्कारातून चैतन्यमय कार्यक्रमांचे मोहक दर्शन घडले. कलाकारांची कल्पकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाची किमया या दोहोंच्या संगमामधून निर्माण झालेले चमत्कार नजरेसमोर साकारतांना ते अनुभव कल्पनेच्या पलीकडचे चित्तथरारक होते. काही सुखद व मनोहर होते तर काही मनाला न रुचलेले असे असले तरी त्यामधून जे समाधान पदरात पडले ते सकारात्माकच होते. अनुपम सौदर्याने भारावलेले ते दिवस म्हणजे दिवास्वप्नात रंगवलेले आयुष्याच्या पुस्तकातील एक सुरेख प्रकरण आहे. हे सौदर्य पुढील वाटचालीत

नक्कीच मला ऊर्जा देईल यात काहीही शंका नाही. परदेश फिरणं म्हणजे चैन करणं नव्हे खूप काही अनुभवायला, शिकायला मिळते. ज्ञानाबरोबर विचारांच्या शाखा रुंदावतात. 'कॉक्स ॲन्ड किंग्स'चे टूर मॅनेजर विनय झिंगाडे हे आमच्याबरोबर युरोप टूरवर होते. त्यांनी वेळोवेळी दिलेली माहिती हे पुस्तक लिहितांना खूप उपयोगी पडली त्यामुळे त्यांचे विशेष आभार. तसेच थोर साहित्यिका माधवी कुंटे यांनी पुस्तकाला प्रस्तावना लिहिली. हे पुस्तक तयार करण्यासाठी ज्यांनी प्रोत्साहन देऊन सहकार्य केले ते आदरणीय मा. प्रदीप भिडे, मुकुंद सराफ, आणि माझे कुटुंबिय व साहित्यिक मित्र, मैत्रिणी यांचेही विशेष आभार. 'मोहक युरोप' हे पुस्तक रसिक वाचकांच्या हाती देतांना मला आनंद होत आहे. हे पुस्तक आपणास नक्कीच आवडेल अशी मी आशा करते...

लता गुठे



‘मोहक युरोप’ विषयी थोडेसे काही...

कथा आणि कविता या साहित्य प्रकारामध्ये रमणाऱ्या लता गुठे यांनी मोहक युरोप या पुस्तकाद्वारे प्रवासवर्णनाच्या प्रांतात प्रवेश केला आहे.

विमान प्रवासाचे वर्णन, त्या त्या वेळची मन:स्थिती या गोष्टी पहिल्या प्रकरणात एकदमच एकत्रित रित्या प्रस्तुत करून मग ओळीने तेरा दिवस जे पाहिले आणि डोळ्यांच्या कॅमेऱ्यात बंदिस्त केले, मन:पटलावर जे उमटले ते सलगपणे शब्दबद्ध केले आहे त्यामुळे पुस्तकात रेखीव बंदिस्तपणा आला आहे.

एका प्रवासी कंपनीच्या युरोप सहल कार्यक्रमात लेखिका सहभागी झाली. अशा सहल आयोजनाचे सूत्र असते ते कमीत कमी वेळात जास्तीत जास्त स्थलदर्शन घडविणे त्यामुळे एखादे ठिकाण खूप आवडले तर तिथे राहावे, तिथल्या लोकांशी संवाद साधावा असे वाटले तरी ते शक्य होत नाही. लुव्रसारख्या वस्तुसंग्रहालयासाठी एखादा तास अगदीच अपुरा पडतो ल्यूसर्न सारख्या अत्यंत निसर्गरम्य ठिकाणाहून परत फिरण्यासाठी पाऊल उचलवत नाही. कुठल्याही प्रवासी कंपनीच्या सहलींची ही मर्यादा असते. ती लेखिकेला वारंवार जाणवत राहाते आणि वारंवार प्रकटही होत राहाते.

युरोपचं निसर्गसौंदर्य, तिथली कमी असलेली लोकसंख्या, त्या मंडळीचं नियम पालन, शिस्त बद्धता, निसर्ग इतिहास वारसा जतन करण्याची त्यांची वृत्ती, तिथली स्वच्छता, हे सर्व बघताना, आनंद अनुभवताना लेखिकेच्या मनात आपल्या देशाशी तुलना सहजपणे उमटते. अमाप निसर्गसौदर्याचं वरदान भरभरून लाभलेल्या आपल्या देशात पुरातन वस्तू, प्राचीन वास्तू, आपला प्राचीन वारसा सांगणारी

उत्तम स्थळे यांची अक्षम्य हेळसांड, कोणत्याही निसर्गरम्य स्थानाकडे झालेले दुर्लक्ष, तिथे असलेली अस्वच्छता, सहलस्थळं म्हणून त्याचा विकास न होणे इत्यादि गोष्टींची खंत लेखिका वेळोवेळी व्यक्त करते.

प्रत्येक देशात पाहिलेल्या वास्तू, सौदर्यस्थळे, वगैरेबद्दलची अनेक तऱ्हेची माहितीही लेखिका आवर्जून नोंदविते, त्यासाठी चौकस बुद्धीने सहजपणे ठिकठिकाणी विचारणा करते. आपल्याला कित्येक गोष्टी माहित नसतात त्यामुळे कधी आश्चर्य तर कधी गंमत वाटते. 'पिकॅडिली' हे नाव कसं पडलं ? या मागे गंमतीदार हकीगत आहे. 'पिकॅडिली' म्हणजे विशिष्ट प्रकारची कॉलर. तेथील एक शिंपी शिवत असे शिवणकामावर तो इतका श्रीमंत झाला की त्या ठिकाणी त्यानं मोठं घर बांधलं आणि त्याला नाव दिलं पिकॅडिली. मग पुढे तो राहात होता त्या चौकालाही पिकॅडिली तेच नाव मिळालं.

'टॉवर ऑफ लंडन' हा किल्ला कधी निवास तर कधी तुरूंग म्हणून उपयोगात आणला गेला या ही विरोधाभासाची गंमत वाटते.

'टॉवर ऑफ लंडन'च्या किल्ल्यात खूप कावळे आहेत. त्यामागेही एक मजेशीर मिथक कथा आहे. असं म्हणतात की दुसऱ्या चार्लसला कुणीतरी भविष्य सांगितले होते की जो पर्यंत कावळे आहेत तो पर्यंत भविष्य राजवंश राहील म्हणून कावळ्यांना अभय मिळालं. त्याचं घर शेणाचं न राहाता अलिशान महालाच्या परिसरात ते राहू लागले. अशा अनेक गंमती त्या त्या ठिकाणाबद्दल लिहितांना कथनाच्या ओघात येतात. युरोपची वैशिष्टये नोंदवतांना लेखिका म्हणते, "इथे कुठेही घाण नाही, प्रदुषण नाही कुठेही रस्ते खोदलेले नाहीत. नेत्यांचे कट आऊट्स नाहीत सगळं स्वच्छ आणि सुंदर आहे." इटलीतील रोम, तेथील शिल्पकलेचे अद्‌भुत नमूने, ट्रेव्ही फाऊंटन, व्हेनिस मधील कॅनाल मधून

गंडोलातून केलेली सफर आणि हॉलंडमध्ये ठिकठिकाणी असलेली फुलं, बसच्या बस वाहून नेणारी 'युरो ट्रेन' आणि समुद्राखालून काढलेला तिचा मार्ग हे सारं वाचून आपण स्मित होतो. पिसाचा झुलता मनोरा आणि पॅरिसचा आयफेल टॉवर याचं वर्णन आणि माहिती त्या त्या स्थळाबद्दलचं औत्सुक्य जागृत करते. ब्रुसेल्सचा मनॅकन हा शू करणाऱ्या मुलाचा पुतळा आणि त्यामागची दंतकथा आपल्या चेहऱ्यावर स्मित उमटवल्या खेरीज राहात नाहीत.

स्वित्झर्लंडला लेखिका खऱ्या अर्थी रमते. तिथला समृद्ध निसर्ग कुणालाही मंत्रपाश घालणारा आहे. तिथे जाणाऱ्या प्रत्येकाला तिथेच वास्तव्य करावं असं वाटल्याखेरीज राहात नाही. ठिकठिकाणची वस्तुनिष्ठ माहिती लेखिका देतेच. पण तिचा पिंड कवयित्रीचा असल्याने ती प्रत्येक ठिकाणचं निसर्गसौंदर्य उत्कटतेने शब्दात उतरविते, "सुंदर आखीव रेखीव शहर, निळ्याशार स्फटिकांच्या राशी सांडल्यासारखे जलाशय, खळखळ वहाणाऱ्या नितळ पाण्याच्या नद्या, हिरवीगार दाट झाडी, बर्फाचे मुकुट परिधान केलेले डोंगर, या सौदर्यावर मोहित होऊन त्याच्या प्रेमात न पडणारा असा कोणीही सापडणार नाही " असं लेखिका सहज लिहून जाते तेव्हा ती अख्खी फ्रेम आपल्या मनात जिवंत होते. "ऱ्हाईनच्या धबधब्याचे आश्चर्य पाहून मन धबधब्यासारखे उसळून येत होते. किंवा अनेक रंगाच्या त्या नभाच्या अंगणात मी स्वतःला झोकून दिलं" अशी छोटी-छोटी वाक्ये सुद्धा त्या सुंदर दृष्याची झलक दाखवून जातात. रोममधील ऐतिहासिक वास्तू, ठिकठिकाणची भव्य चर्च, यांच्याबद्दल लिहितानाच ठिकठिकाणचा थोडक्यात इतिहासही त्या जोडीला लिहिल्यामुळे त्या स्थलवर्णनाला एक पूर्णत्व आले आहे.

ज्या क्रमाने लेखिका प्रवास करते त्या क्रमाने ती वाचकालाही

शब्दांच्या साहाय्याने युरोपचा फेरफटका घडवून आणते. जे कुणी युरोपच्या प्रवासाला जाणार असतील त्यांना आधीच उत्तम तऱ्हेने उमजेल. तेथील सौदर्य अधिक संवेदनशीलतेने बघता येईल. ज्यांनी हा प्रवास केलेला असेल त्यांच्या आठवणी ताज्या होतील आणि ज्यांना हा प्रवास करता येणार नाही त्यांना लता गुठे यांच्या बरोबर शब्दांच्या साथीने युरोप हिंडल्याची पर्वणी लाभेल. लेखिकेचा प्रवास वर्णनाचा पहिला प्रयत्न असूनही पुस्तक उत्तम झाले आहे. पुस्तकाची छपाई मुखपृष्ठ वगैरे निर्मिती मूल्य उत्तम राखलेली असल्याने पुस्तक सर्वार्थाने वाचनीय आणि संग्राह्य झाले आहे. लता गुठे यांच्या पुढील लेखनाबद्दल अपेक्षा उंचावल्या आहेत त्यासाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा देते.

माधवी कुंटे



अंतरंग



विमान प्रवास मुंबई ते लंडन



एखाद्या प्रेयसीला तिच्या प्रियकराला भेटण्याची ओढ लागते ना! अगदी तशीच आतुरता स्वप्नातील स्वर्ग पाहाण्यासाठी लागली होती. १६ एप्रिल, २०१३ हा जाण्याचा दिवस एकदाचा उजाडला. सामानाची बरीचशी बांधाबांध आधीच केलेली होती. पासपोर्ट व प्रवासात लागणारं आवश्यक सामान वरच्या हँडबॅगेत ठेवले. सर्व सामानासह सकाळी सात वाजता घराच्या बाहेर पडलो. तीन तास आधीच सहार विमानतळावर पोहोचलो.

एक नंबर गेटला पोहोचल्यावर सामान काढून ट्रालीवर रचले. तेथे चौकशी केल्यानतर सिक्युरीटी गार्डने गेट नंबर चारला जायला सांगितले. दारापाशी जाताच काचेचा दरवाजा सर्रकन उघडला. एका मोठ्या स्क्रीनवर तेथून टेक ऑफ होणाऱ्या प्रत्येक विमानाचे स्थान, उड्डाण क्रमांक आणि वेळ अनुक्रमांकानुसार दाखवले जात होते. आम्ही ज्या विमानाने जाणार होतो त्या 'एअर एमिरेट्स' विमानाची नोंद घेतली. मोठ्या सामानाच्या बॅगा पाठवून लगेच बोर्डिंग पासच्या लाईनला उभे राहिलो. लवकर गेल्याचा एक फायदा झाला तो म्हणजे, मला खिडकीच्या बाजूची जागा मिळाली. बोर्डिंग पास घेऊन प्रवासी मंडळी अधीरपणे

येरझाऱ्या घालत होते. काही पुस्तके पाहाण्यात दंग होते तर काही उगीचच पेपर चाळत टाईमपास करत होते. पुढचे दोन तास काय करायचे हा प्रश्न होताच. आजूबाजूला बसलेल्या पॅसेंजरांकडे नजर फिरवली 'कॉक्स ॲन्ड किंग्सची' बॅग असलेले पॅसेंजर उगीच जवळचे वाटू लागले. सुरुवातीला फक्त हास्य, नंतर हळूहळू ओळख होऊ लागली. एकदाचे नऊ वाजले, आमच्या विमानाची सूचना कानावर पडताच आम्ही हँडबॅगा उचलल्या अन् चालू लागलो. नियोजित वेळेनुसार विमान होते. विमानाच्या प्रवेशद्वारावर मस्त, सडपातळ बांध्याची, गोरीपान, अरेबियन पद्धतीचा ड्रेस घातलेली हवाईसुंदरी हसून सर्वांचे अदबीने स्वागत करत होती. तिच्या लालभडक लिपस्टीकमधून हळूवार बाहेर पडणारी स्मितरेषा, गालाचा गुलाबी रंग अधिकच खुलवत होती. मरुन रंगाच्या गोल टोपीच्या खालून सोडलेली पांढरीशुभ्र ओढणी गालाच्या बाजूने समोरून मागे खांद्यावर टाकलेली होती. बेज कलरचा टॉप आणि स्कर्ट घातलेली 'ती' विमानातल्या प्रवाश्यांचे खास आकर्षण होती. विधात्याच्या कुशलतेचा तो देखणा नमुना पाहातच राहावा असे वाटत होते, चेहऱ्यावरुन नजर हटत नव्हती. त्याच गणवेशात आणखी चार पाच हवाई सुंदऱ्या, काय हवं नको ते विचारत लगबगीने फिरू लागल्या. काही लहान मुलं शोधून त्यांना खेळणी देऊ लागल्या तर काही निमुळती ट्रॉली सरकवत पाणी, ज्यूस सर्व्ह करू लागल्या. गोऱ्या रंगाच्या सुंदर मुलींमध्ये एक काळ्या रंगाची हवाई सुंदरी काळ्या मार्बलमध्ये कोरलेल्या मोहक शिल्पाकृती प्रमाणे आकर्षक दिसत होती तिला पाहून कवितेच्या ओळी उगीचच आठवू लागल्या -

''एका तळ्यांत होती, बदके पिल्ले सुरेख
होते कुरूप वेडे, पिल्लू तळयात एक...''

सिटबेल्टने स्वतःला खुर्चीला गच्च बांधले होते. खिडकीच्या बाजूची जागा असल्यामुळे खुश झाले परंतु काही क्षणातच निराशा पदरात पडली कारण छोट्याशा बंद खिडकीतून बाहेर पाहिले तर, विमानाचा पंखा सोडून काहीच दिसेना त्यामुळे वैतागून विमानात नजर फिरवली. समोरच्या छोट्याशा टी.व्ही.वर विमानाची धावपट्टी दिसू लागली. विमान हवेत स्थिरावले मुंबईचा समुद्र, शहर मागे टाकत दुबईच्या दिशेने विमानाने वेग घेतला. मी पुस्तक काढून वाचू लागले. वाचण्याचाही कंटाळा आला. नंतर काही वेळ टी.व्ही.चे चॅनल बदलण्यात वेळ घालवला. तेवढ्यात दुबईला दहा मिनिटात पोहोचण्याची उद्घोषणा झाली. ठीक ११-२० वाजता विमान दुबईच्या विमानतळावर उतरले. लंडनला जाण्यासाठी पुढील विमान दुपारी तीन वाजता होते. सामानाच्या बॅगा परस्पर विमानात शिफ्ट करणार असे समजल्यावर जरा बरे वाटले. एवढा वेळ घालवायचा कसा ? हा प्रश्न समोर उभा ठाकला होता. दुबईचं भव्य-दिव्य विमानतळ फिरून पहाणे एवढाच पर्याय होता. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून बांधलेले व आधुनिक सोई सुविधांनी सज्ज असलेले विमानतळ पाहाताच श्रीमंत देशाच्या वैभवाची जाणिव झाली. एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीत जाण्यासाठी लहान रेल्वे होत्या. ज्या व्यक्तींना चालण्याचा त्रास आहे अशा लोकांसाठी व्हीलचेअर व ज्यांच्या कडेवर मुलं आहेत,जे पेशंट आहेत त्यांच्यासाठी खास छोट्या फिरत्या फ्री कारही दुबईच्या विमान तळावर उपलब्ध होत्या. इमारतीच्या मध्येच रंगीत कारंजी नाचत होती. घुमटाकृती पारदर्शक बिलोरी छताचे छ़त्र विमानतळाच्या माथ्यावर विराजमान होते. सर्वबाजूंनी काचेमधून दिसणाऱ्या धावपट्टीवर येणाऱ्या जाणाऱ्या विमानाचे दर्शन घडत होते. आत बाहेर असलेली चौफेर ऊंच हिरवीगार झाडं हे नयन मनोहर दृश्य पाहून

आपण एका विमानतळात आहोत असं वाटतच नव्हतं. आतमध्ये असलेले मॉल्स, दुकानं, शिल्प चित्रांनी सजवलेलं विमानतळ पाहातांना आपण एखाद्या सुंदर शहरात फिरत आहोत असे वाटत होते. दुबईचे विमानतळ पहाणे हाच एक युरोप सहलीतील खास आनंद होता. फिरून पाय थकल्यामुळे एका ठिकाणी आराम खुर्चीत बसून झोप काढली तोपर्यंत एक वाजून गेला होता. दुपारी परत अडीच वाजता दुबईचा निरोप घेऊन लंडनला जाणाऱ्या विमानात बसलो. त्यानंतर ते तिथेच एक तास लेट झाले. साडेतीनला आमचे प्रयाण लंडनच्या दिशेने झाले. दुबई ते लंडन या प्रवासात एक चित्रपट पाहून झाला. चहा, कॉफी, ज्यूस घेऊनही कंटाळा आला. संध्याकाळी ८.३० वाजता लंडनला 'हिथ्रो'विमानतळावर आमचे विमान एकदाचे लँड झाले. ■■■

कला, संस्कृती, सभ्यता, शिक्षण यांचा सुरेख संगम - लंडन



लंडन येथील ‘हिथ्रो’ विमानतळावर संध्याकाळी ८.३० वाजता विमान उतरले. तेथील विमानतळावर चेकिंग फॉर्म भरणे व सिक्युरीटीजचे सर्व सोपस्कार पूर्ण करेपर्यंत पंधरा वीस मिनिटे गेली. नंतर सामानाच्या बॅगा कोणत्या ठिकाणी येणार हे शोधण्यात व त्या मिळवण्यात बराच वेळ गेला. बॅगा फरफटत लॉबीत आलो तेथे ‘कॉक्स ॲन्ड किंग्स’चा बॅनर घेऊन आमचे टूर मॅनेजर विनय झिंगाडे उभेच होते. त्यांनी ‘कॉक्स ॲन्ड किंग्स’च्या सर्व प्रवाशांना बाजूला एका ठिकाणी थांबायला सांगितले. विमानतळाच्या बाहेर खूपच थंडी होती, पाऊस पडत असल्यामुळे थंड गारवा आलिंगन देत होता. स्वेटर्स, शाली बॅगेत ठेवल्या असल्यामुळे कुडकुडत उभे होतो. थोड्याच वेळात बस आल्यावर बस चालकाने बॅगा बसच्या डिकीत व्यवस्थित लावल्या. मोठ्या बॅगा पाठीमागे, छोट्या बॅगासमोर रचून आरामात डिकी बंद केली. बसचे दोन्ही दरवाजे उघडल्यानंतर आम्ही आतमध्ये जाऊन बसलो. बस बंद असल्यामुळे थंडी अजिबात जाणवत नव्हती.

ढगाळ वातावरणामुळे बसच्या बाहेर फारसे दिसत नव्हते. रस्त्याच्या बाजूची सर्व दुकाने बंद झाली होती. रस्त्यावरचे होर्डिंग्स, स्ट्रीट लाईट्स व गाड्या सोडून काहीही दिसत नव्हते. दहा मिनिटातच आम्ही हॉटेल ‘हॉलीडे इन एक्सप्रेस’ येथे पोहोचलो. तेथे गेल्यानंतर लॉबीमध्ये बॅगा ठेवून आधी जेवण करुन घेतले कारण रेस्टॉरंट बंद करुन मॅनेजरला घरी जायचे होते. विमान दोन तास लेट पोहोचल्यामुळे जेवणासाठी ते आमची वाटच पाहात होते. जेवण झाल्यानंतर आमचे टूर मॅनेजर विनयने दुसऱ्या दिवसाचे संपूर्ण वेळापत्रक सांगितले. ‘‘सकाळी सहा वाजता रुमवर वेकअप कॉल येईल, ७ वाजता बरोबर इथेच नाष्टा करण्यासाठी यायचे आहे. नाष्टा सकाळी ७ ते ८ या वेळेत असेल. आपण लंडन फिरण्यासाठी ८.२० वाजता निघणार आहोत. कोणाला पाच

मिनिटे देखील उशीर झाला तर बस येथे असणार नाही. यापुढे दहा दिवस सकाळचे हेच वेळापत्रक असेल, वेळापत्रकात बदल असेल तर त्या-त्या वेळी तुम्हाला कळवले जाईल'' असेही त्यांनी सांगितले.

दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता आम्ही बसमध्ये बसून 'थेम्स' नदीच्या किनाऱ्यावर वसलेले प्राचीन शहर 'लंडन' पाहायला निघालो.

थोडे अंतर गेल्यानंतर एका चौकात बस थांबली. तेथे एक गाईड बसमध्ये चढले विनयजीनी त्याची ओळख करुन दिली. हातात माईक घेऊन ''नमस्कार मंडळी'' म्हणताच त्या गाईडवर सगळे खूश झाले. त्यांनी लंडनचा इतिहास सांगण्यास सुरूवात केली, ''साधारण पाचव्या शतकात जर्मन वंशाच्या 'एंगल्स' या जमातीने पहिल्यांदा या भूमीवर वसाहत स्थापन केली त्यामुळे या देशाला 'इंग्लंड' हे नाव प्राप्त झाले आहे. पूर्वीचे लंडनचे नाव होते 'लॉडीनियम' या नावाची खूण आजही कॅनन स्ट्रिटवर एक रोमन लोकांनी बसवलेला 'लंडन स्टोन' आहे त्यावर पाहायला मिळते.

अश्मयुगात सुमारे सहा हजार वर्षापूर्वी येथे मानवी वस्ती होती. इ.स. त्रेचाळीस मध्ये रोमनांनी पहिली स्वारी इंग्लंडवर केली. पाचव्या शतकात अँग्लो सॅक्सन राजवट निर्माण झाली. घटनादत्त राजेशाही व संसदीय लोकशाही प्रणाली येथे चालते. त्याचबरोबर लोकमताचा आदर करणारी राजेशाही पद्धती तेथे पाहायला मिळते. इंग्लंडच्या उत्तरेला 'स्कॉटलंड' व पश्चिमेला 'वेल्स' हे दोन देश आहेत. बराचसा भाग समुद्राने व्यापलेला आहे. इंग्लडची राजधानी लंडन येथे असल्यामुळे व ऐतिहासिक ब्रिटीश साम्राजाचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने ते जगातील अव्वल क्रमांकाचे शहर आहे तसेच एक महत्त्वाचे जागतिक व्यापाराचे केंद्र असल्यामुळे जगभरातून व्यापारी लंडनला भेटी देतात. या देशामध्ये 'स्टर्लिंग पाऊंण्ड' हे चलन चालते. अनेक महत्त्वाच्या देशांची

हेडक्वार्ट्सही लंडनला थाटली आहेत. तसेच ब्रिटीश साम्राज्याचे हे केंद्रस्थान आहे. औद्योगिक क्रांती घडून आलेला जगातील पहिला व अग्रस्थानी असलेला हा देश आहे. तसेच इंग्रजी भाषेचं उगमस्थान आहे. युरोपमधील महत्त्वाच्या पाचशे कंपन्यांपैकी शंभर कंपन्यांची मुख्य कार्यालये लंडनमध्ये आहेत. लंडन हे राजधानीचे दिमाखदार शहर आहे.''

लंडनमध्ये फिरतांना, तसेच तेथील म्युझियम्स पाहाताना, आपल्याला लंडनच्या इतिहासाची ओळख होते. वर्षभर पडणारा पाऊस, ढगाळ वातावरणामुळे दिवसभर कातरवेळेसारखं मनाला अनामिक हुरहुर जाणवणारं वातावरण, कधी बर्फाची भुरभुर तर कधी पावसाची रिमझिम, अशा अनेक रंगात ढंगात निसर्गाचे दर्शन घडते.

घडोघडी बदलणारं लहरी हवामान, विस्तीर्ण समुद्र किनारा, छोट्या मोठ्या पर्वतरांगा, बारमाही वाहाणाऱ्या सेव्हर्न, थेम्स, हम्बर, टायनी इत्यादि महत्त्वाच्या नद्या व अफाट हिरवीगार जमीन इ. भौगोलिक परिस्थितीमुळे युरोपचा प्रदेश,'सुजलाम् सुफलाम्' असलेला प्रदेश पर्यटकांचे वर्षभर स्वागत करतो.

या भूमीवर जन्माला आलेले नररत्न म्हणजे सर आयझॅक न्युटन, स्टिफन हॉकिंग्ज, चार्ल्स डार्विन, फ्रान्सिस बेकन अशा प्रज्ञावंत शास्त्रज्ञांनी केलेल्या कार्यामुळे, इंग्लंडची वैज्ञानिक परंपरा समृद्ध झाली जगभरात इंग्लंडचा नावलौकिक वाढला.

सोळाव्या शतकात लंडन शहराचा विकास आणि विस्तार झाला. यु.के.च्या लोकसंख्येपैकी ८५ टक्के लोकसंख्या एकट्या इंग्लंडची आहे. लंडनमध्ये पहिला रेल्वेमार्ग १८३६ मध्ये सुरु झाला. त्याच काळात अंडरग्राऊंड रेल्वे सुरु झाली. कधी आगीच्या विळख्यात सापडून तर कधी प्लेगसारख्या महाभयंकर साथीच्या आजारात लंडनचे बरेच

नुकसान झाले. त्यातुनही ते पुन्हा पुन्हा सावरले. नव्याने शहराची निर्मिती झाली दुसऱ्या महायुद्धात जर्मन हवाई हल्ल्यामध्ये शहर पुन्हा उध्वस्त झाले होते. त्यानंतर अनेक वास्तुशास्त्रज्ञांनी व तंत्रज्ञांनी एकत्र येऊन नवीन शहराचा आराखडा तयार करुन परत शहराची नव्याने बांधणी केली. त्यानंतर खऱ्या अर्थाने लंडन ग्लोबल सिटी बनले. इतिहास सांगता सांगता गाईड पटकन म्हणाला,

लंडनमध्ये पर्यटकांना पाहण्यासारखी खूप ठिकाणं आहेत. ब्रिटिश लायब्ररी, नॅशनल गॅलरी, लंडनमधील ब्रिटिश म्युझियम इत्यादि महत्त्वाची ठिकाणं आहेत. त्यापैकीच एक पिकॅडिली सर्कल हे महत्वाचे ठिकाण आहे. ''आपण आता पिकॅडीली सर्कस या चौकात पोहोचत आहोत.'' तेथे आम्ही पोहचलो तेव्हा मी गाईडला सहजच विचारले,

''हे पिकॅडिली म्हणजे काय ?''

तेव्हा ते म्हणाले,''पिकॅडिली म्हणजे शर्टाची विशिष्ट पद्धतीची कॉलर. येथे राहणारा एक शिंपी होता तो तशा कॉलरचे शर्ट बनवायचा ते विकून व मोठमोठ्या श्रीमंत लोकांचे कपडे शिवून त्याने प्रचंड पैसे कमावले व या ठिकाणी घर बांधले. त्या घराला 'पिकॅडिली' हे नाव दिले. हे ठिकाण म्हणजे शहरवासियांचे करमणूकीचे ठिकाण मानले जाते. येथे सात रस्ते एकत्र येतात. याच चौकात शॉपिंग मॉल्स व दुकाने आहेत. चार्ल्स बेरीने बांधलेल्या 'हाऊस ऑफ पार्लमेंट' व इतरही इमारती चौकात आहेत. तसेच अब्राहम लिंकन यांचा पुतळे आहे व इतर अनेक महत्त्वाच्या राजकीय नेत्यांचे पुतळाही तेथे आहेत. १० डाऊनिंग स्ट्रीटवरचे पंतप्रधानांचे घर, ट्रॅफल्गार स्क्वेअर, सेंट पॉल्स कॅथेड्रल, हाइड पार्क, व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट म्युझियम, मार्बल आर्च इत्यादि लोकप्रिय ठिकाणे आहेत. ''

शहराचं वास्तुंचं सौंदर्य नजरेच्या कॅमेऱ्याने मनात उतरत होतं.

स्वच्छ रस्ते, रस्त्यावर शिस्तीत चालणारी वाहने, लालसर गुलाबी रंगाच्या, रस्त्यावर धावणाऱ्या बसेस. ह्या सगळ्या गोष्टी लक्ष आकर्षित करत होत्या. तिथल्या काही भागात फिरतांना वाटत होते. मी मुंबईमध्येच नरिमन पॉईंट, हुतात्मा चौक, राजाबाई टॉवर, विद्यापीठाची इमारत, कोर्ट इत्यादी ठिकाणं पाहात आहे. लंडन फिरतांना मला मुंबईची आठवण प्रकर्षाने येत होती. मी मनातल्या मनात मुंबईची अनेक गोष्टींशी तुलना करत होते. फक्त इथल्यासारखा आवाज तिथे नव्हता, गर्दी नव्हती, घाण कचरा नव्हता. सगळीकडे चकाचक दिसत होते. फ्लोरा फाउंटनच्या आसपासच्या इमारतीसारख्या सुंदर दगड विटांनी बांधलेल्या जुन्या सुंदर इमारती, समोरच्या बाजूने छान कोरीवकाम केलेले, मनोरे असलेल्या दुधाळ इमारती, सरळ रस्ते, जागोजागी असलेले चौक पाहतच रहावसं असं वाटत होतं.

विज्ञानाचा हात धरुन संस्कृती, कला व इतिहासाचे त्यांनी सुंदर जतन केले आहे. ज्ञानाचा वारसा व नैसर्गिक सौंदर्याची ते मनापासून जोपासना करत आहेत त्यामुळे एखाद्या सौंदर्यवतीसारखी इंग्लंडची राजधानी लंडन दिमाखात उभी आहे.

बसमधून लंडन फिरत फिरत आम्ही पोहोचलो 'बकिंगहॅम पॅलेस' समोर लंडन येथील राजघराण्याचे आलिशान निवासस्थान आहे ते लांबूनच दिसणारा भव्य राणीचा शाही राजवाडा दिसला राजवाड्यासमोरची मखमली हिरवळ, त्या हिरवळीवर चकरा मारणारे चेंजिंग गार्ड्स तेथील राज वैभव मनाला भुरळ घालत होते.

एक घर केवढं असू शकतं ? हा प्रश्न जेव्हा गाईडने विचारला तेव्हा सगळ्यांचेच अंदाज चुकीचे निघाले. गाईड आतील खोल्यांचे वर्णन करु लागला तेव्हा आम्ही सर्वच आश्चर्याने त्यांच्याकडे पाहू लागलो. गाईडने राणीच्या महालाची दिलेली माहिती अशी, ''साधारण १७०३ साली

'ड्यूक ऑफ बकिंगहॅम' याने या ठिकाणी एक मोठे घर बांधले त्याचे नाव बकिंगहॅम हाऊस असे ठेवले. नंतर १७६२ साली राजा जॉर्ज तिसरा याने हे निवासस्थान आपल्या ताब्यात घेतले. त्याने राजमहालाचा विस्तार केला. त्यानंतर १८३७ साली राणी व्हिक्टोरियाच्या काळात या महालाला अधिकृत शाही राजमहालाचा दर्जा प्राप्त झाला. १८४० साली व्हिक्टोरिया राणीचा विवाह झाला. त्यानंतर पती प्रिन्स अल्बर्ट यांच्या सोबत त्या बकिंगहॅम पॅलेसमध्ये राहायला गेल्या. त्यानंतर त्यांनी राजमहालातील अनेक उणीवा दूर करुन तो आणखी सुंदर व देखणा बनविला. आता राजवाड्यात सातशे खोल्या आहेत. त्यातल्या अतिशय सुरक्षित व निवांत ठिकाणी राजपरिवाराचे निवासस्थान आहे. राणीच्या खिदमतीला तीनशे नोकर आहेत. १८८ कर्मचाऱ्यांच्या खोल्या आहेत, ५२ प्रिन्सिपल बेडरुम्स, ९२ कार्यालये, ७८ बाथरुम्स, १९ स्टेट रुम्स तेथे आहेत. दुसऱ्या महायुद्धात व त्यानंतरही अनेक वेळा बकिंगहॅम पॅलेसवर बॉम्बहल्ले झाले आहेत. एकदा तर राणी एलिझाबेथ व राजा चौथा जॉर्ज आतमध्ये असतांना बॉम्बहल्ला झाला, परंतु त्यांना त्यामध्ये काही नुकसान झाले नाही.



रोज हजारोच्या संखेने पर्यटक 'चेंजिंग ऑफ गार्डस्'चा समारंभ पाहाण्यासाठी गर्दी करतात. जेव्हा राणी महालामध्ये असते तेव्हा महालावर झेंडा फडकावत ठेवतात असेही आमच्या गाईडने सांगीतले.

राजमहालाचं वर्णन ऐकून मी म्हटलं,

''हा राजमहाल की आख्ख गाव आहे!''

'बकिंगहॅम पॅलेस' हे राजा-राणीचे शाही निवासस्थान असले तरी ती राष्ट्रीय संपत्ती मानली जाते. सर्वसामान्य लोकांना कित्येक मिटरवरुन गेटच्या बाहेरून राजमहाल पाहाण्याची परवानगी आहे. पर्यटकांसाठी बाजूलाच कला दालन पाहाण्यासाठी वर्षभर खुले असते. तेथे निवडक व आकर्षक असे राज घराण्यातील लोकांचे फोटो व इतर गोष्टींचे प्रदर्शन लावलेले असते. काही महत्त्वाच्या समारंभाला शहरातील लोक राजवाड्यात जातात. ५० हजारापेक्षा जास्त लोक राजमहालात होणाऱ्या उत्सवात सहभागी होतात.

राजमहालाच्या समोरच्या बाजूने भक्कम लोखंडी गेट, त्या गेटवर दोन्ही बाजूंनी सुरेख लॅम्प्स लावलेले आहेत, गेटच्या समोरच्या बाजूला छान कोरीव काम केलेले आहे. राजवाड्याभोवती मोहक हिरवळीचा मो्ठ्याच्या मोठ्ठा गालीचा पसरलेला आहे व गेटच्या अगदी समोर एक आकर्षक कारंजे बसवलेलं आहे. त्याच्या बाजूने राणीचे, शहरातील सर्व सामान्य नागरिकांचे व मत्स्यकन्येचे अशी काळ्या व पांढऱ्या संगमरवरामध्ये कोरलेली शिल्पे आहेत. कारंजाला लागूनच एक सुरेख फुलांची बाग आहे. तो स्वर्ग फक्त अर्ध्या तासात पाहून, मनाच्या कॅमेऱ्यात साठवून आम्ही तेथून इच्छा नसतानाही निघालो.

''नमस्कार मंडळी, कसा वाटला आमच्या राणीचा महाल?''

अगदी सोप्या, साध्या इंग्रजीमध्ये गाईड आमच्याशी संवाद साधत होता. आम्ही फक्त लय भारी म्हणालो तोही हसला त्याला काय समजले

असेल माहित नाही. बसमध्ये बसल्या बरोबर गाईडने बोलायला सुरुवात केली.

"आपण आता 'टॉवर ऑफ लंडन' हा सुप्रसिद्ध किल्ला पाहायला जाणार आहोत. हा किल्ला सन १०७८ मध्ये 'विल्यम दि काँकरर' यांनी थेम्स नदीच्या किनाऱ्यावर बांधला किल्ला एखाद्या छोट्याशा गावासारखा आहे. भक्कम तटबंदी, मोठे बुरुज, खंदक, शास्त्रागार कार्यालये, महाल, वाडे, भुयारं आहेत व तेथे असलेला राजमहाल यामुळे पर्यटकांचे तो आकर्षण आहे. सहाशे वर्ष या किल्याचे बांधकाम चालू होते .या किल्ल्याचा वापर कधी राजमहाल, तर कधी तुरुंग म्हणून तर कधी प्राणी संग्रहालय इत्यादि वेगवेगळ्या गोष्टींसाठी केलेला आहे. राणी एलिझाबेथ हिला राज्ञीपद मिळण्याआधी याच ठिकाणी काही दिवस तुरुंगात ठेवण्यात आले होते असेही गाईडने सांगितले." या किल्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तेथे किल्ल्याच्या आजूबाजूला खूप कावळे दिसत होते. राजा 'चार्लस दुसरा' याला कोणीतरी भविष्य सांगितले होते की, जोपर्यंत कावळे इथे आहेत इंग्लडचा राजवंश राहील. कावळे नाहिसे होतील तेव्हा इंग्लंडचा राजवंश नष्ट होईल. या भविष्यवाणीनंतर त्या कावळ्यांची निगराणी करण्यासाठी कावळ्यांच्या रक्षणाची खास सोय केलेली आहे. 'लंडन ऑफ टॉवर' मध्ये खास प्रदर्शन पाहाण्यासाठी आम्ही गेलो तेथे हिरे, माणकं, पाचू असलेले मौल्यवान राजमुकूट, सोन्याची भांडी, तलवारी, खंजीर, सुबक सुरय्या, पेले, भरजरी प्राचीन राजवस्त्र व इतर गोष्टी पाहायला मिळाल्या. ह्या सर्व मौल्यवान वस्तू काचेच्या पेट्यांमध्ये बंदिस्त करुन सुरक्षित ठेवलेल्या होत्या. राजा रणजितसिंहाने राणी व्हिक्टोरियाला १०२ कॅरेट वजनाचा कोहिनूर हिरा नजराणा म्हणून दिला होता. भारतीय कोहिनूर हिराही राजमुकुटात विराजमान असलेला खास तिथे पाहायला मिळाला. 'ट्रेटर्स गेट' या महाद्वारापासून थेट

नदीपर्यंत पायऱ्या आहेत. पूर्वी त्याच रस्त्याने वेस्टमिन्स्टर कोर्टातून दोषी ठरलेल्या कैद्यांना नावेतून किल्यात आणले जायचे किल्ल्याच्या भोवतीचा परिसर अतिशय नयनमनोहर असा आहे. तेथे फोटो काढून आम्ही किल्ल्याच्या जवळच असलेला 'टॉवर ब्रिज' पाहाण्यासाठी गेलो.

त्या ब्रीजचे महत्वाचे वैशिष्य म्हणजे त्या पुलाचा मधला भाग हवा तेव्हा उघडता येतो व बंद करता येतो मधून दुभंगणाऱ्या पुलाखालून मोठमोठी जहाजे ये जा करतात. ब्रिज कधी तिरकस फिरवता येतो तर कधी उभा करता येतो म्हणूनच तो ब्रिज पर्यटकांचे आकर्षण बनला आहे.

लांबूनच छान दोन उंच टॉवर दिसले. पुलावरुन प्रचंड वाहतूक दिसत होती. पुलाच्या दोन्ही टोकाला टॉवर असल्यामुळे या पुलाला 'टॉवर ब्रिज' असे म्हणतात. १८८६ मध्ये या पुलाच्या बांधकामाला सुरुवात झाली. १८९४ मध्ये तो वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. वर्षभरातून साधारण ९०० वेळा हा पूल उघडला जातो. 'टॉवर ब्रिज'च्या वरच्या बाजूला जुना लंडन ब्रिज आहे. जवळ जवळ इ.स. ६० पासून हा ब्रिज थेम्स नदीवर आहे. अगदी सुरुवातीच्या काळामध्ये साधा लाकडी पूल होता परंतु वादळामुळे व पुरामुळे तो खराब झाला. त्यानंतर ११३६ मध्ये तो आगीत जळला. त्यानंतर त्या ठिकाणी दगडी पूल बांधण्यात आला. या पूलाचे बांधकाम ३३ वर्ष सुरु होते.त्यानंतर तो ६०० वर्ष टिकला तो पडल्यानंतर एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीला 'रेने' नावाच्या प्रसिध्द इंजिनियरने हा ब्रिज दगड सिंमेंटच वापर करुन भक्कम बांधला. पुलाच्या बाजूने फिरतांना तेथे असलेल्या इमारती व मॉल्सही पाहायला मिळतात. लंडन ब्रिजच्या किनाऱ्याचा परिसर अतिशय सुंदर, स्वच्छ आहे. तिथे फिरुन मस्त रमत गमत गप्पा मारत फेरफटका मारुन झाल्यानंतर लंडन शहराचा काही महत्त्वाचा भाग पाहाण्यासाठी आम्ही निघालो.

बसमधून जातांना रस्त्याच्या बाजूची हिरवीगार झाडं, चौकाचौकात असलेले फुलांचे रंगीत ताटवे मनाला उत्साहित करत होते. रस्त्यावर छान लालसर गुलाबी रंगाच्या पारदर्शक बसेस दिसत होत्या. त्या बसेसमध्ये फक्त तुरळक प्रवासी पाहून प्रश्न पडायचा इतक्या कमी पॅसेंजरसाठी बससेवा चालू ठेवायला यांना कसं परवडतं? रस्त्याने आणखी एक आकर्षण जाणवायचं ते म्हणजे छोट्या छोट्या स्मार्ट कार्स. पुढे दोन सिट्स, एक ड्राईव्हरची आणि दुसरी त्याच्या बाजूची मागे सामान ठेवण्यासाठी जागा असते. दिसायलाही ह्या कार्स सुंदर आणि वापरायलाही सोईच्या असतात त्यामुळे त्या गाड्या जास्त आहेत मोटारसायकल अगदीच कमी म्हणजे एक टक्काच असतील. आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे कुठेही रस्त्याचे किंवा इमारतीचे नवीन बांधकाम सुरू असलेले दिसले नाही. गाडयांचे हॉर्न ऐकायला मिळाले नाहीत त्यामुळे धूळ, धूर, आवाजाचे कसलेही प्रदूषण जाणवत नव्हते. बाहेर थंडी भरपूर असल्यामुळे बसमधून शहर पाहायला बरे वाटायचे. रस्त्यावरून जातांना जाहिरातीचे होर्डिंग्ज दिसत होते. परंतु कोणत्याही चौकात, रस्त्यावर राजकारण्यांच्या मुखवट्याचे बॅनर लागलेले नव्हते. माझं लक्ष पूर्णपणे गाडीच्या बाहेर होते. इतरांच्या हातात कॅमेरे किंवा मोबाईल्स होते. सर्व फोटो काढण्यात गुंतलेले हाते. तेवढ्यात आमचे गाईड म्हणाले, ''मंडळी आपण आता समोरच 'हाईड पार्क' नावाचे छान उद्यान आहे ते पाहून बरोबर १.२० वाजता याच ठिकाणी सर्वांनी यायचे आहे. शक्यतो सर्वजण माझ्याबरोबर राहा म्हणजे मागे पुढे राहाणार नाहीत.''

शहराच्या मध्यावर असलेले प्रशस्त, हिरव्यागार झाडांनी नटलेले, तीनशे पन्नास एकरमध्ये विस्तारलेले ते भव्य उद्यान, दुपारच्या सोनेरी उन्हात शेकत बसले होते. त्या निसर्गरम्य परिसरात 'सर्पेंटाइन' हे देखणे

व आकर्षक सरोवर असल्यामुळे उद्यानाच्या सौंदर्यात भर पडली आहे. दुपारी तशी फारशी गर्दी तेथे नव्हती मोकळ्या हवेत विरंगुळा म्हणून काही पर्यटक निवांत रेंगाळतांना दिसत होते तर काही लोकल ऑफिसमधील नोकर वर्ग जॉगींगला आलेले होते. 'मार्बल आर्च' समोरील हा पार्क पूर्वीपासून सभेसाठी प्रसिध्द आहे. कोणीही तिथे जाऊन भाषण ठोकू शकतो. अनेक मोर्चे, तसेच तेथे निदर्शनेही होत असतात. याच पार्कमध्ये डायनाचे स्मृतिस्थळही पाहायला मिळते. वीस मिनिटात किती पहाणार ? थोडसं फिरलो, फोटो काढले आणि परत जिथे उतरलो होतो तिथे बसची वाट पहात थोडा वेळ उभे होतो. रस्त्याच्या बाजूने बरेच तरूण-तरूणी जॉगींग करतांना दिसले. मी गाईडला विचारले, " हे का धावत आहेत ?"

तेव्हा त्यांनी मला सांगितले,''त्यांना सकाळी बऱ्याच लांबून ऑफिसमध्ये यावं लागतं. दोन दोन तास प्रवासातच जातात. दिवसभर बंद ए.सी.मध्ये बसून रहावे लागते. लंचब्रेक हा जास्त वेळ असतो. त्यामुळे बाहेर फ्रेश हवेत ते धावतात, व्यायामही होतो. अंगातली थंडी कमी होते. त्याचबरोबर वेळही सत्कारणी लागतो म्हणून दुपारी जॉगींग करतात. आमचं बोलणं संपायच्या आत बस समोर येऊन उभी राहिली.

बसमध्ये बसून थोडे अंतर पुढे गेल्यानंतर 'ज्युबिली' गार्डनच्या पश्चिम टोकाला येताच दुरूनच 'लंडन आय' दिसू लागले. सायकलच्या



तिरप्या चाकासारखे दिसणारे चक्र जवळ येताच अतिशय भव्य वाटू लागले. ‘थेम्स’ नदीच्या दक्षिण काठावर असलेल्या अवाढव्य चक्राला ‘मिलेनियम व्हिल’ असेही म्हणतात. ४४३ फूट उंच हे चक्र असून, त्या चक्राला बत्तीस वातानुकूलित कॅप्सूल्स जोडलेल्या आहेत. त्या कॅप्सूल्समध्ये आम्ही जेव्हा बसलो तेव्हा एका छोट्याशा सुंदर रुममध्ये आपण बसलो आहोत असे वाटले. चहूबाजूंनी पारदर्शक आवरण असलेल्या ह्या कॅप्सूल्स सावकाश वर-वर जाऊ लागतात. वरती गेल्यानंतर थोडा वेळ थांबतात. त्या ठिकाणावरुन अख्खं लंडन पाहातांना आपण विमानातून खाली पाहात आहोत असे वाटत होते. शहरातील उद्याने, थेम्स नदीचा परिसर, टॉवर ब्रिज, चर्च सर्व काही अतिशय छान दिसत होते. प्रत्येक कॅप्सूल्समध्ये पंचवीस पर्यटक बसण्याची व्यवस्था होती. अतिशय संथ गतीने एक फेरी पूर्ण करायला अर्धा तास लागला. आम्ही खाली आलो तेव्हा वरची कॅप्सूल पाहून आश्चर्य वाटले. बापरे! आपण इतकं उंचावर जाऊन आलो की काय? मी मनाशीच उच्चारले. चाळीस मजली इमारती इतक्या उंचावरुन ते खाली येते परंतु आपल्याला जाणवतही नाही. लंडन आय हे यंत्र तयार करण्यासाठी १७०० टन एवढे लोखंड वापरलेले आहे. एका वेळेस चारशे पर्यटकांना घेऊन फिरणारे हे अजब चक्र पाहातांना खूप मस्त अनुभव येतो. लंडन आयमध्ये फेर फटका मारुन झाल्यानंतर परत बसमध्ये बसून आम्ही ‘ट्रॅफल्गार स्क्वेअर’ पाहायला गेलो.



'ट्रॅफल्गार स्क्वेअर' म्हणजे इंग्रजी आरमाराच्या विजयाचे स्मारक होय. इ.स. १८०५ मध्ये 'लॉर्ड नेल्सन' याने नेपोलियनच्या आरमाराचा ट्रॅफल्गार येथे पराभव केला. या घटनेची आठवण म्हणून एका प्रसिद्ध चौकात उंच स्तंभ उभारलेला आहे. याच चौकात नेल्सनचा पुतळाही दिमाखात उभा आहे. चार सिंहांचे भव्य शिल्प कोरलेले आहे. चौकात एक आकर्षक शानदार कारंजेही बसवलेले आहे. हा चौक बसमधूनच फिरुन पाहिला.

चार-पाच ठिकाणं पाहाण्यातच दुपारचे दोन वाजले होते जेवणाची वेळ झाली. जवळच असलेल्या एका पंजाबी ढाब्यासारख्या घरगुती आटोपशीर असलेल्या हॉटेलमध्ये दुपारच्य जेवणाची व्यवस्था केली होती. गेटमध्ये एका पंचवीस सव्वीस वर्षाच्या तरुण मुलाने आमचे स्वागत केले सर्व जेवण तयारच होते आणि सेल्फ सर्विस असल्यामुळे जेवणासाठी फारसा वेळही जात नव्हता. व्हेज कढाई, पनीर टिक्का, पराठे, दही, व्हेजबिर्यानी, पापड, लोणचे असा छान बेत होता. जेवण झाल्यानंतर परत पाच वाजेपर्यंत बसमधून लंडन पाहात पाहात शहरातच गोल-गोल चक्कर मारले तेथून काही अंतरावर 'मादाम तुसाँ वॅक्स म्युझियम' पाहाण्यासाठी आम्ही जायला निघालो.


मेणाच्या पुतळ्याचे प्रदर्शन पाहाण्यासाठी मी आतूर होते कारण बऱ्याच वेळा त्या पुतळ्यांबद्दल मी ऐकले होते. 'मादाम तुसाँ ' या फ्रेंच महिलेने १८०२ साली मेणाच्या पुतळ्याचं प्रदर्शन लंडनमध्ये भरवले. त्याच वेळी इंग्लड-फ्रान्स युद्ध सुरु झाले त्यामुळे त्यांना परत जाणे शक्य झाले नाही म्हणून त्या तिथेच राहिल्या त्यानंतर त्यांनी कायमस्वरूपी मेणाच्या पुतळ्यांचं दालन लंडन येथे उभारले. त्यानंतर बऱ्याच वेळा त्याच्या जागा बदलल्या १८८४ साली या प्रदर्शनाची स्थापना केली. देशोदेशीच्या अनेक सुप्रसिद्ध व्यक्तींना त्या ठिकाणी स्थान मिळते. मादाम

तुसाँ वारल्यानंतरही त्यांची कला त्यांच्या नावाने पर्यटकांना पाहायला मिळते. 'मादाम तुसाँ' यांचा पुतळाही तेथे आहे. अगदी आता उठून चालायला बोलायला लागतील असे ते पुतळे हुबेहूब जीवंत माणसासारखे दिसतात. त्या प्रदर्शनात अमिताभ बच्चन, ऐश्वर्या रॉय, शाहरुख खान यांचेही पुतळे तेथे पाहिले. इतर पुतळ्यांपेक्षा आपल्या देशातल्या पुतळ्यांकडेच आमचे लक्ष जास्त होते. त्याचबरोबर नेल्सन मंडेला व इतर देशांच्या प्रसिद्ध व्यक्तिंचे व खेळाडूंचे, नट-नट्यांचेही पुतळे तेथे पाहायला मिळतात.

संध्याकाळी सात वाजता बरोबर हॉटेलवर पोहोचलो. लगेच फ्रेश होऊन डिनरला गेलो. नऊ वाजता रुमवर आल्यानंतर दिवसभर लंडनमधील महत्त्वाची पर्यटन स्थळांचं टिपण करतांना परत संपूर्ण शहराची मनातल्या मनात पुनरावृत्ती झाली, दुनियेतलं सर्वात आकर्षक शहर कोणतं असेल तर ते म्हणजे लंडनच. बरच शहर पाहायचं राहिलं याची हुरहुर मनात राहिली. लंडन फिरण्यासाठी आपल्याकडे निवांत वेळ हवा म्हणजे प्रत्येक ठिकाणाच्या सौंदर्याचा आनंद घेता येईल. दिवभर पाहिलेलं लंडन मनात जपत दुसऱ्या दिवसाच्या प्रतिक्षेत झोप लागली.■■■



मनमोहक - पॅरिस



ई साहित्य प्रतिष्ठान

लता गुठे यांनी लिहिलेलं हे अत्ताच्या युरोपचं सुंदर वर्णन जास्तीत जास्त वाचकांपर्यंत जावं अशी इच्छा आहे. म्हणून त्यातील जास्तीत जास्त भाग आपल्या वेबसाईटवरून प्रदर्शित केला आहे. पुस्तकाची साईझ मोठी असल्यामुळे सध्या तरी ते संपूर्ण पुस्तक वेबसाईटवर उपलब्ध नाही.

संपूर्ण पुस्तकासाठी कृपया संपर्क साधा :

lataguthe@gmail.com